25038-42

अत्यंत महत्वाचे

जा.क्र.उमा१/कोवि/जाहीरातनकार/पवित्र/१८
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर
दिनांक- 26 OCT 2018

प्रति,

अध्यक्ष/सचिव, सर्व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था, कोल्हापूर विभाग,
प्राचार्य/ मुख्याध्यापक, अनुदानित/विनाअनुदानित कनिष्ठ महाविदयालये,/उच्च माध्यमिक शाळा,
कोल्हापूर विभाग (सर्व)

विषय- १) कनिष्ठ महाविदयालये/उच्च माध्यमिक शाळामधील अनुदानित व विनाअनुदानित कडील पद भरती प्रवित्र प्रणालीमधून करणेबाबत
२) जाहीरात परवानगी/पदभरती साठी प्रस्ताव या कार्यालयाकडे न सादर करणेबाबत

संदर्भ-१) शासन निर्णय क्र एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२, दि. ६/२/२०१८
२)शासन निर्णय दिनांक २०/६/२०१४ व दि. १९/७/२०१४, दि. ४/६/२०१६
३) शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१७/(२०/१७)/टीएनटी-२, दि. २३/८/२०१७
४) शासन निर्णय क्र.एसएसएन-२०१८/(प्र.क्र.९४/१८)/टीएनटी-२, दि.४/४/२०१८
५) शासन निर्णय क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.१४९/टीएनटी-१, दि. २०/६/२०१८
६) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २१३९१-९५, दि. २०/९/२०१७
७) मा. आयुक्त, शिक्षण पुणे यांचेकडील पत्र दि. २९/८/२०१८

खाजगी शिक्षण संस्था/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांचे प्राचार्य यांचेकडून पदभरतीस परवानगी मिळणेबाबत/जाहीरात परवानगी मिळणेबाबत (एनओसी) चे प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त होत आहेत.

याबाबत, वरील विषय संदर्भाचे सर्व शासन निर्णय अवलोकनी घ्यावेत. महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर सदरचे शासन निर्णय उपलब्ध आहेत.

उपरोक्त विषय संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार खाजगी अनुदानित/विनाअनुदानित शाळातील पायाभूत मंजूर पदावर खात्याकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच पद भरती विहित कार्यपध्दतीप्रमाणे करणेचे आदेश आहेत.

संदर्भ क्र. २ नुसार उच्च माध्यमिक कडील शिक्षक संवर्गाची पायाभूत मंजूर पदावर पदभरती संदर्भात नाहरकत प्रमाणपत्र देणेसाठी मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त होती.

संदर्भ क्र. ३ व ५ च्या शासन निर्णयानुसार पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या (अल्पसंख्याक संस्था वगळून) शाळांमधील शिक्षक निवडीसाठी पारदर्शक पध्दती विहित करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणेत आलेला आहे. व त्यानुसार सध्या पवित्र प्रणालीमधील शिक्षक पदभरती संदर्भाची कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे. या कार्यालयाचे पत्र दिनांक ११/१०/२०१८ नुसार याबाबत कळविणेत आलेले आहे.

या कार्यालयाचे संदर्भ क्र. ६ , दिनांक २०/९/२०१७ चे पत्रान्वये, उच्च माध्यमिक कडील शिक्षक/शिक्षकेतर पद भरतीबाबतचे प्रस्ताव नस्तीबध्द करणेत आलेचे कळविणेत आलेले आहे. तसेच नाहरकत प्रमाणपत्राशिवाय करणेत आलेली पदभरती ही बेकायदेशीर असलेने अशा पदभरती केलेल्या प्रस्तावाना या कार्यालयाकडून मान्यता दिल्या जाणार नाहीत असेही कळविणेत आलेले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २३/६/२०१७ नुसार शाळामधील पदभरती पवित्र संगणक प्रणालीच्या माध्यमातून करावयाची असल्याने उच्च माध्यमिक शाळांतील पदे भरण्यास परवानगी देता येणार नाही असेही कळविणेत आलेले आहे.

तथापि, विविध उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांचेकडून अदयापही पदभरतीस परवानगी /नाहरकत प्रमाणपत्र/ जाहीरात परवानगी बाबतचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होत आहेत. संदर्भ क्र. ३ व ५ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे अवलोकन न करता तसेच शिक्षण संचालनालय, या कार्यालयाकडून देणेत आलेल्या वेळोवेळीच्या सूचना यांचा विचार न करता मुख्याध्यापक/प्राचार्य/संस्था या कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवित आहेत ही बाब योग्य नाही.

तरी याद्वारे आपणांस सूचित करणेत येते की, शासन निर्णय दि. २३/६/२०१७ व दि. २०/६/२०१८ नुसार पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे राज्यातील सर्व (अल्पसंख्याक संस्था वगळून) शाळांमधील शिक्षक निवडीसाठी पारदर्शक पध्दती विहित करण्यात आलेली असलेने पवित्र प्रणाली शिवाय या कार्यालयाकडून अनुदानित व विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक पदभरती ( सीएचबी व रजा कालावधी वगळून) बाबत नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबतचे प्रस्तावावर कार्यवाही करणेत येणार नाही तसेच शासनाच्या नाहरकत प्रमाणपत्राशिवाय केलेल्या नियुक्तीस मान्यताही देणेत येणार नाही. यामुळे कोणत्याही प्रकारे संबंधित उमेदवाराचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. तसेच या कार्यालयाकडे जाहीरात परवानगी/पदभरती नाहरकत प्रमाणपत्रासाठी परस्पर या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणेत येवू नयेत. यापूर्वी या कार्यालयाकडे असे प्राप्त झालेले प्रस्ताव रदद करणेत येत असून नस्तीबध्द करणेत येत आहेत याची नोंद घ्यावी. यापुढे यासंदर्भात कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पवित्र प्रणालीमधून कार्यवाही करणेत आलेल्या उच्च माध्यमिक शाळांतील पदभरतीबाबत संदर्भ क्र. ३ व ५ च्या शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे या कार्यालयाच्या स्तरावरील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

( सुभाष चौगुले )
प्र.शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहितीस्तव सविनय सादर

मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२

मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १

मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १